| | | |
|---|---|---|
| **सीएनआर नं. एमएचपीयु–** | दाखल दिनांकः | १४/११ /२०२४ |
| MHCO130002192024 | नोंदणी दिनांकः | १४/११ /२०२४ |
| | निकाल दिनांकः | ३१/०८/२०२६ |
| | कालावधीः | **वः ०१मः०९दिः१७** |

---------------------------------------------

**सोलापूर येथील न्यायाधीश, सहकार न्यायालय , सोलापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती. एस. डी. मुक्कनवार )**

**सहकार केस क्र. २०२ /२०२४** **निशाणी क्र.२७**

शेतकरी ग्रामीण बिगर शेती
सहकारी पतसंस्था मर्या.चांदापुरी ..... वादी
तर्फे सचिव श्री. प्रदीप रामचंद्र मदने
वय. ४५ मु . पो पठाणवस्ती (चांदापुरी),
ता. माळशिरस,जि. सोलापूर

**विरुध्द**

१. श्री. लक्ष्मण महादेव मगर,
वय वर्षे – ४७ धंदा – शेती
रा. मु. पो. गारवड, ता.माळशिरस, जि. सोलापूर ..... प्रतिवादी

२ . श्री. सीताराम आबा करडे,
वय वर्षे – ५८ धंदा – शेती
रा. मु. पो. गारवड ता.माळशिरस, जि. सोलापूर

३ . श्री. सोपान गणपत करडे,

वय वर्षे – ४९ धंदा – शेती

रा. मु. पो. गारवड, ता.माळशिरस, जि. सोलापूर

---

**दावा – रक्कम वसूली करिता दाखल केला आहे**

---

| | | |
|---|---|---|
| वादींतर्फे विधिज्ञ | – | श्री. ए . जे. देशमुख |
| प्रतिवादीतर्फे | – | एकतर्फा. |

## न्यायनिर्णय

**(जाहिर दिनांक ३१/०८/२०२६ )**

०१. सदरचा दावा रक्कम वसुली करिता दाखल केला आहे.

०२. **वादीच्या दाव्यातील थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

वादी सहकारी संस्था असून म.स.सं. कायदा १९६० अन्वये नोंदणीकृत आहे. वादी संस्थे चा त्यांच्या सभासदास कर्ज पुरवठा करण्याचा व्यवसाय आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्रं.१ यांनी वादी संस्थेकडे दिनांक २५/०९/२०१२ रोजी वादी संस्थेकडे व्यवसाय या कारणासाठी कर्ज मिळणेबाबत रितसर अर्ज केला वादीने प्रतिवादीस रक्कम रू.१०,०००/– चे कर्ज मंजुर केले व दि.३०/०९/२०१२ रोजी मंजूर केले. प्रतिवादी यांनी संस्थेच्या नावे दिनांक ०३/१०/२०१२ रोजी वचनचिठठी, करारनामा लिहून दिला. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्याच दिवशी वादी संस्थेस करारनामा ही लिहून दिला. प्रतिवादी क्र. १ यांनी घेतलेले कर्जाउ रकमेवर द. सा. द. शे १५ % प्रमाणे व्याज देण्याचा करार आहे. वादीने घेतलेल्या कर्जास प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची करारा प्रमाणे व्ययक्तिक व संयुक्तिक जबाबदारी आहे . प्रतिवादी क्र. १ ने घेतलेल्या सदरची कर्जाउ रक्कम दरमहा रु.५५५/– अधिक व्याज अशी १८ महिन्यात फेड करण्याचे प्रतिवादिनी मान्य केले आहे. प्रतिवादी

यांनी दरमहा व्याज न दिल्यास ते मुद्दलात समाविष्ट करून त्यावर व्याज आकारण्याचे मान्य केले आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी ठरल्याप्रमाणे वादी संस्थेची रक्कम परतफेड केली नाही त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ ही वादी संस्थेचे थकबाकीदार झालेले आहेत व प्रतिवादी दावा कलम ४ मध्ये तपशील दिले प्रमाणे रक्कम येणे बाकी आहे. सदर रककमेची वादी संस्थेने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडे मागणी करूनही सदर रक्कम देनेस प्रतिवादीने टाळाटाळ केली आहे. वादीने वकिलामार्फत नोटिस पाठवले. नोटिस मिळूनही प्रतिवादीनि अद्याप रक्कम फेड केली नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादी विरुद्ध सदर दावा रक्कम वसुली करिता दाखल केला आहे.

**०४.** प्रतिवाद क्रं.१ ते ३ यांना दाव्याचे समन्स बजावणी करण्यात आले. समन्सची बजावणी होवूनही ते सदर दाव्यात हजर झाले नाही. नि.१ वर आदेश पारित करून दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश दि.१९/०७/२०२५ रोजी पारित केले.

**०५.** वादीचे कथन आणि पटलावरील कागदोपत्री पुरावा पाहुन वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी संस्था प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्याकडुन रक्कम रू.३२,३३७/- द.सा.द.शे. १५% दराने व्याज वसूल करणेस पात्र आहेत का ? | अशंत: होकारार्थी. |
| २) | आदेश व हुकूमनामा काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०६.** वादीने त्याचे कथन शाबित करण्याकरिता प्रकरणात अधिकृत प्रतिनिधिच्या

जबाबाचे शपथपत्र नि.११, कर्ज मागणी अर्ज, वचनचिठठी, कर्जरोखा, करारनामा, खातेउतारा, वादी संस्थेचा ठरावाच्या सत्य प्रती,नोटिस,पोस्टल पावती, ई. नि.१२ ते २३ वर दाखल केल्या आहेत. त्यानंतर वादी यांनी निशाणी २४ कडे पुरसीस देवुन तोंडी पुरावा बंद केला आहे.

**मुददा क्र १ करीता –**

**०७.** वादी संस्थेने दाव्यातील मागणी पुष्ठर्थ त्यांच्या अधिकृत प्रतिनिधिच्या जबाबाचे शपथपत्र नि.११ वर दाखल केले आहे. त्याच बरोबर प्रतिवादी यांच्या कर्जा संबंधित सर्व कागदपत्रे प्रकरणात दाखल केले आहे.

**०८.** वादीचे साक्षीदार यांनी त्यांच्या शपथपत्रात स्पष्ट पणे नमूद केले आहे की प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. वादी संस्थेने प्रतिवादी क्रं.१ यांना रक्कम रू.१०,०००/– चे कर्ज दि.२५/०९/२०१२ रोजीच्या कर्ज मागणी अर्जानुसार दिनांक ३०/०९/२०१२ रोजी मंजूर केले आहे व दिनांक ०३/१०/२०१२ रोजी वादी संस्थेस सदर रककमेची वचन चिठी लिहून दिली आहे. वादी संस्थेने त्यांच्या जबाणीस दुजोरा देण्याकरिता प्रकरणात नि.१३ ते १८ अन्वये दाखल केलेल्या अर्ज, वचनचिठठी, कर्जरोखा, करारनामा, खातेउतारा यावरून असे दिसून येते की प्रतिवादीस वादी संस्थेकडून रक्कम रू.१०,०००/– रूपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. त्याच बरोबर सदर कागदपत्रावरून असे दिसून येते की प्रतिवादीने कर्ज कागदपत्रे वादी संस्थेच्या हक्कात करून दिली होती व प्रतिवादी क्रं. २ ते ३ यांनी वादी संस्थेस संयुक्तीक व व्यक्तीशः प्रतिवादी क्रं.१ यांनी घेतलेल्या कर्ज रक्कमेची परतफेड करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. दाव्यामध्ये दाखल नि.१८ वरील कर्ज खाते उताऱ्यावरुन दि.३०/०९/२०२४ रोजी रक्कम रुपये ३२,०८७/– इतकी येणे बाकी आहे. प्रतिवादी दाव्यात हजर झाले नाही व वादीचे कथन नाकारले नाही. परंतु दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की मुळ कर्जाची रक्कम १०,०००/– आहे. अशा परिस्थित वादी मागणी प्रमाणे व्याजासह रक्कम मिळनेस पात्र ठरतो का. कलम ४४अ महाराष्ट्र सहकारी

कायदयानुसार वादी संस्था व्याजासह कर्जाच्या दुप्पट रक्कम वसुल शकत नाही. सदर दाव्यामध्ये वर चर्चा केल्या प्रमाणे वादीने दिलेली मूळ कर्ज रक्कम ही १०,०००/– आहे परंतु कलम ४४ अ नुसार वादी २०,०००/– पेक्षा जास्त रकमेची मागणी करू शकत नाही. वादीने मागणी केलेली रक्कम ३२,०८७/–आहे. त्यामुळे वरील सर्व बाबी लक्षात घेता व दाव्यातील व्यवहाराचे स्वरुप लक्षात घेता न्यायाच्या दृष्टिने वादी संस्था दावा दाखल तारखेपासून रक्कम रू. २०,०००/– द.सा.द.शे ६% व्याज दर प्रमाणे वसुल करणेस न्यायउचित ठरते. त्यामुळे वादी संस्था सदरील दराने रक्कम वसुल करण्यास पात्र आहे.

१०. वरील नमूद तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करून मुद्दा क्रं.१ चे उत्तर अशंत: होकारार्थी देण्यात येत व मुद्दा क्रं.२ च्या उत्तराकरिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा दावा खर्चासह अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी संस्था प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडुन व्ययक्तीक व संयुक्तीकरित्या रक्कम रुपये २०,०००/– (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) वर द.सा.द.शे.६ टक्के दराने दावा दाखल तारखे पासुन ते निवाडयातील संपुर्ण रक्कम वसूल होईपर्यंत व्याज वसूल करण्यास पात्र आहेत.

३. येणे प्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

SONALI DEVIDASAPPA MUKKANWAR

Digitally signed by SONALI DEVIDASAPPA MUKKANWAR
Date: 2026.09.01 12:45:34 +0530

ठिकाणः सोलापूर, (**एस.डी.मुक्कनवार**)

दिनांकः ३१/०८/२०२६ न्यायाधीश,

सहकार न्यायालय, सोलापूर

## सोलापूर येथील न्यायाधीश, सहकार न्यायालय , सोलापूर यांचे न्यायालयात
## (पिठासीन अधिकारी श्रीमती. एस. डी. मुक्कनवार )

**सहकार केस क्र. २०२ /२०२४** **निशाणी क्र.२७**

शेतकरी ग्रामीण बिगर शेती
सहकारी पतसंस्था मर्या.चांदापुरी ..... वादी
तर्फे सचिव श्री. प्रदीप रामचंद्र मदने
वय. ४५ मु . पो पठाणवस्ती (चांदापुरी),
ता. माळशिरस,जि. सोलापूर

विरुध्द

१. श्री. लक्ष्मण महादेव मगर,
वय वर्षे – ४७ धंदा – शेती
रा. मु. पो. गारवड, ता.माळशिरस, जि. सोलापूर ..... प्रतिवादी
२ . श्री. सीताराम आबा करडे,
वय वर्षे – ५८ धंदा – शेती
रा. मु. पो. गारवड ता.माळशिरस, जि. सोलापूर
३ . श्री. सोपान गणपत करडे,
वय वर्षे – ४९ धंदा – शेती
रा. मु. पो. गारवड, ता.माळशिरस, जि. सोलापूर

-----------------------------------------

**दावा – रक्कम वसूली करिता दाखल केला आहे**

-----------------------------------------

वादींतर्फे विधिज्ञ – श्री. ए . जे. देशमुख
प्रतिवादीतर्फे – एकतर्फा.

## निवाडा

ज्या अर्थी, वादीने प्रतिवादीविरूध्द रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केलेला होता. दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना योग्यरित्या बजावल्यानंतर, दाव्याच्या चौकशीनंतर सहकार केस नं. २०२/२०२४ मधील दि.३१/०८/२०२६ रोजीच्या न्यायनिर्णयामधील नमूद कारणमिंमासेनुसार मी खालिलप्रमाणे निवाडा देत आहे.

१. वादीचा दावा खर्चासह अशंत: मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी संस्था प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडुन व्ययक्तीक व संयुक्तीकरित्या रक्कम रुपये २०,०००/– (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) वर द.सा.द.शे.६ टक्के दराने दावा दाखल तारखे पासुन ते निवाडयातील संपुर्ण रक्कम वसूल होईपर्यंत व्याज वसूल करण्यास पात्र आहेत.

सदरील निवाडा आज दि.३१/०८/२०२६ रोजी तयार करून न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिला.

| खर्च | कोर्ट फी स्टॅंम्प | डिपॉझिट | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| वादी | रु.६५३/– | ० | ० | रु.६५३/– |
| प्रतिवादी | ० | ० | ० | ० |

SONALI DEVIDASAPPA MUKKANWAR

Digitally signed by SONALI DEVIDASAPPA MUKKANWAR
Date: 2026.09.01 12:45:50 +0530

ठिकाणः सोलापूर,
दिनांक – ३१/०८/२०२६

**(एस.डी.मुक्कनवार)**
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, सोलापूर.